प्रेसनोट दिनांक २६/०२/२०२४

**''उप अधीक्षक'' भुमी अभिलेख कार्यालय, डहाणू व''अभिलेखापाल''उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय डहाणू यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी लाच स्विकारताना ताब्यात घेतले बाबत''**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | डहाणू पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७, ७ अ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१)श्री.गोरख शंकर घुमरे, वय–३९ वर्षे, अभिलेखापाल, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, डहाणू ता.डहाणू जि.पालघर, (वर्ग ३),**<br>**(२) श्री.प्रफुल्ल लक्ष्मण संखे, वय ५४ वर्ष, उप अधीक्षक, भुमी अभिलेख, डहाणू, ता.डहाणू जि.पालघर (वर्ग–२)** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | आलोसे क.१ यांनी ५०००/–रूपये.<br>आलोसे क.२ यांनी २५,०००/–रूपये. |
| ७ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांच्या मामाच्या मुलाच्या मालकीच्या जमीनीची मोजणी आलोसे यांच्या कार्यालयाकडून करण्यात आली होती. केलेल्या जमीन मोजणीची हद्द दाखवून मोजणी नकाशा (क प्रत) तयार करून देण्यासाठी आरोपीत लोकसेवक क्र.१ याने तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २६/०२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२६/०२/२०२४ रोजी पंचासमक्ष आलोसे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करतात अगर कसे यांची पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्या मामाच्या मुलाच्या मालकीची जमीन मोजणीची हद्द दाखवून मोजणी नकाशा तयार करून देण्यासाठी आज दिनांक २६/०२/२०२४ रोजी आलोसे क्र. १ यांनी ३०,०००/–रूपये लाचेची मागणी करून त्याप्रमाणे आलोसे क्र.१ यांनी तक्रारदाराकडून ५०००/–रूपये आणि आलोसे क्र.२ यांनी २५०००/–रूपये आलोसे यांचे उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, डहाणू येथे १८.०६ वाजता पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्विकारली असता दोन्ही आलोसे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dyspacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– --
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्सॲप क्र. :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर